Registered with RNI BHAVMALA
MAHABIL 06842/2013 Year-10, Issue-38, July -Aug-Sept 2023

Printed Book/Periodicals
Book-Pocket

प्रति,
श्री./श्रीमती ____________________
____________________
____________________

If Undelivered return to :

**प्रेषक :-**
**प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे**
संपादक, भावमाला
ग्रीन पार्क-१, श्रीरामपूर,
पुसद, जि. यवतमाळ (महा.) ४४५२१५

ISSN2395-0366

# भावमाला

वर्ष-१० वे, अंक-३८, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२३

• संपादक – प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे •



## त्रैमासिक 'भावमाला' परिवाराकडून संशोधन लेख मूल्यांकन समिती (रिसर्च पेपर रिव्हिव्ह कमिटी)

(खालील प्रमाणे सत्र २०२३-२०२४ साठी नियुक्त केली आहे.)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. अतुल टेवरे, अमरावती | ८२७५६५९७१० |
| २. | प्रा. डॉ. नवनाथ गोरे, संभाजी नगर | ९४२३२६१११४ |
| ३. | प्रा. डॉ. उदय जाधव, खटाव, सातारा | ९४२३८०७५०५ |
| ४. | प्रा. डॉ. सुनिल तोरणे, कवठे महाकाळ | ७४२०००८४६४ |
| ५. | प्रा. डॉ. दिनेशचंद्र राऊत, अमरावती | ८९९९८९४२१४ |
| ६. | प्रा. डॉ. युवराज मानकर, यवतमाळ | ९८९०४६७६१३ |
| ७. | प्रा. डॉ. माधव जाधव, नांदेड | ९४२३४३९९९९ |
| ८. | प्रा. डॉ. सुवर्णा गाडगे, अमरावती | ९४२३१५२९१२ |
| ९. | प्रा. डॉ. पुनम येसंबरे, वर्धा | ९८९०९३३९८० |
| १०. | प्रा. डॉ. प्रमोद धनविजय,वाशिम | ९४०८०९१२२६ |
| ११. | प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे, उमरखेड, यवतमाळ | ९४०४१३५८७० |

**सूचना :-**

- या त्रैमासिकासाठी लेखकांनी आपले शोधनिबंध, कथा परीक्षण आदि साहित्य श्री लिपी ७०८ या फॉन्ट मध्ये पाठवावे.
- या त्रैमासिकासाठी वर्गणीदारांनी आपली वार्षिक वर्गणी पी.जे. वावरे, पी.एन. कॉलेज, पुसद यांचे नावे SBI Pusad Branch A/C. No. 10940932279, IFSC Code SBIN 0000459 Seving A/C या खात्यात जमा करावी.
- या त्रैमासिकासाठी वर्गणीदारांनी आपली वार्षिक फक्त बँक खात्यामध्येच जमा करावी. मनिऑर्डर पाठवू नये.



ISSN2395-0366
वर्ष - १० वे जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२३
अंक मूल्य - १००/- वार्षिक वर्गणी - ४०० रु.

* कला,साहित्य, भाषा, समाज, संस्कृती, संवर्धनाचे विचारपीठ *

# भावमाला

• मुख्य संपादक •
प्रो.डॉ. प्रल्हाद वावरे
Email : wawre123_66@rediffimail.com
drpjwawre@gmail.com

• सह संपादक •
प्रो.डॉ. गजानन घोंगटे
वनोजा, जि. वाशिम

**मुद्रण :** निलेश प्रिंटर्स, आठवडी बाजार, पुसद, जि. यवतमाळ
**प्रकाशक :** अंजनी पब्लिकेशन, श्रीरामपूर, पुसद, जि. यवतमाळ
**अक्षर जुळवणी व मांडणी :** शशीकांत ना. वाकले, अमरावती
**मुखपृष्ठ संकल्पना :** अनामिका
**संपादकीय पत्र व्यवहार :** प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे, संपादक, भावमाला. 'प्रथमेश', २८/२९ ग्रीनपार्कनं. १, श्रीरामपूर, पुसद, जि. यवतमाळ ४४५२१५
**संवाद संपर्क :** ९४२१७७१७३३, ८८३०३२४१०९



Scanned with CamSca

## अंतरंग

- **शोध निबंध/लेख-**
  १) 'पांढर' उध्वस्त होत चाललेल्या खेड्यांच चित्रण - डॉ. सुभाष गव्हाणे
  २) मजबुती का नाम महात्मा गांधी - प.स.उपाध्य दादासाहेब बोबडे
  ३) 'स्नेन माय फायर...' एक ज्वलंत कादंबरी - डॉ. अतुल टेवरे
  ४) वऱ्हाडी बोली भाषेचा प्रवास काल आणि आज - अरूण विघ्ने
  ५) उपासमार आणि माणूसपणे भाषाबोले आत्मकथन 'वाटी' - डॉ. अनंता सूर
- **परीक्षणे / प्रतिक्रिया -**
  १) 'रे आभाळा...' वेदनेची आर्त ललकारी - डॉ. कैलास दौंड
  २) 'सरपंच असावी अशी' - भास्कर बंगाळे यांची कादंबरी - पंडित कांबळे
  ३) 'गोरबोली' भारतातील सर्वात प्राचीन मूळ बोली भाषा - बलदेव आडे
  ४) निसर्ग आणि बळीराजाच्या ऋणानुबंधाची 'भूळतेर' - डॉ. पुरुष येसंबरे
- **ओळख नव्या पुस्तकांची-**
  १) मराठी व्रतकथा : आकलन आणि समिक्षा - डॉ. संतोष चतुर
  २) महानुभाव आश्रम कार्याचे स्वरूप - डॉ. अण्णा वैद्य
  ३) साहेब खंदारे 'अक्षर आणि टीका' ज्ञानाला दृष्टी देणारा माणुस - डॉ. विठ्ठल जिवतोडे
- **कथा / ललित -**
  १) ३६५ दिवस हार्टफूल गोष्टी बरोबर (फेसबुक/वाटस अॅपवरून साभार) - संकलन - चि. ओंकार मनिष व्यवहारे
  २) आठवणींचा वनवास - डॉ. ललताई थोरात
  ३) बंड्या (फेसबुक वॉलवरून साभार) - अनिल साळे
- **कविता -**
  १) गझल - मधुर पटेल
  २) निष्पर्ण - राव पाचलेकर
  ३) उन्हाळ्यातील सकाळ - शॅमिला गडकरी
  ४) प्रश्न - दीपकराव खराती
  ५) हाले खेळले ऋतु - प्रा. मीरल केकरे
  ६) शब्द दिसावे परी आत्मा - डॉ. विनायक शितोळे
  ७) आता मी कोणता म्हणावे बेट वाटू - प्रा. सुनिल तोरणे
  ८) अंकित्व - गजानन पुंडे
  ९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - राजेश चैतन्य (बाबूस्मन)
  १०) वान - प्रशांत ढोले
  ११) पैसा पैसा .... - प्रा. राजाराम बनसकर
  १२) शिकवण शिंगाची - गणेश सोनकर
  १३) मुक्त - डॉ. मंदा गंगूरकर
  १४) घर - डॉ. गजानन पोंगटे
  १५) धुरा - विजय विटेड



हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्क क्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशित केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.




## संपादकीय....

मित्रांनो, धन्यवाद

आज त्रैमासिक भावमालेचा ३८ वा अंक आपले हाती देतांना मनस्वी आनंद होतो आहे. साहित्य सोनियाच्या खाणी.... आज सर्वसामान्य वाचक रसिकांच्या हृदयातून अपार ओसंडताहेत....जिकडे तिकडे भाषा आणि साहित्य प्रसवण्याची रेलचेल आहे खरे तर आज विचारांची अभिव्यक्ती सर्वत्र बघायला मिळते आहे याचा मनस्वी आनंद आहे, ही साहित्य यात्रा, साहित्यवारी सदोदित क्षितीजाकडे झेपावत आहे, याचा मनस्वी आनंद आहे. ह्या साहित्यपंढरीचे वारकरी अनेकजण आहेत आपापली पालखी सांभाळून पुढे जात आहेत. विशेष उल्लेखनीय म्हणजे मलाही घेऊन जात आहेत एकटा काहीच करू शकत नाही तुमच्यामुळे शान आहे भावमालेची असं मी समजतो. आज सर्वत्र अराजक पसरलेलं आहे लोक कशी वागतात ते महत्वाच नाहीच मी कसा वागतोय हे महत्वाच आहे. सबसे बडा रोग, क्या कहेंगे लोग.... मी जेव्हा ही चळवळ दहा वर्षांपूर्वी हाती घेतली तेव्हा अनेकांना अप्रूप वाटलं....कसा चालवेल...आज मै चलता रहा...कारवा आता रहा साथ साथ...जरूर खूप मोठी माणसं नसतील सोबतील मात्र जी आहेत ती खूपच मोठी आहेत माझ्या दृष्टीने २०२३ ची उपलब्धी अशी की, प्रा. डॉ. गजानन पोंगटेसरांसारखा अत्यंत चांगला मित्र लाभला अर्थात इतरही जिवलग मित्र चांगलेच आहेत...दुमतच नाही मात्र या मित्राने दिलखुलास मनापासून भावमालेला मदत केली मी अंक बंद करण्याच्या तयारीत होते तो म्हणाला नाही आपण सुरूच ठेऊ भरघोस मदत केली....मित्रांनो, हे सांगितलच पाहिजे ज्याने चळवळ जिवंत ठेवण्यासाठी जलसिंचन केलय...आग लावणार्‍यांपेक्षा विझवणारा ग्रेटच असतो...चिमणी नदीपात्रातून चोचितून पाणी आणुन आग विझवत होती तेव्हा इतर सवंगडी म्हणत होते एवढ्याने काय होईल असं नाहीच त्या चिमणीचा जो प्रामाणिक प्रयत्न होता त्याची नोंद इतिहासाने घेतली. आपण हे विसरता कामा नये, आम्ही हा अंक पैसे मिळविण्यासाठी चालवत नाही तर भाषा व समाजाला जागृत करण्यासाठी करतोय....दहा वर्ष झालीत अभिमान वाटतोय आता की, आपलं साहित्य काही प्रतिष्ठीत संपादक मंडळी छापत नव्हती आज हा विचारमंच सर्वसामान्यांचा आहे. ही उपलब्धी आहे भावमालेची...कोणाला काहीही वाटो....काही विद्वान म्हणतात भावमाला सोडून बोला....तेव्हा किव वाटते अशांची की, मदत तर करीतच नाही पण हे सोडून बोला म्हणता हे चूक आहे...आपण नकीच जागतिक स्तरांवरील विद्वान असाल दुमतच नाही असावेही पण त्याचवेळी निष्ठेने चालविलेल्या चळवळीचा उपमर्द करावा ही दुर्दैवी बाब आहे. आज जे खरे पाईक आहेत ते टिकाही करतात मदतही करतात...चूकाही कळवतात मला छान वाटते. कारण त्यामुळे सुधारणा होते यावर माझा विश्वास आहे असो....मला ग्रामीणभागातून ही चळवळ चालवतांना अनेक अडचणी येतात...त्यावर मात करून पुढे जातोय...

मनातलं बोललो, वाईट वाटून घेऊ नये एवढी अपेक्षा, कारण आजवरच्या इतिहासात चांगलं काम करणार्‍यांना जास्त त्रास मुद्दाम दिल्या जातो याची अनेक उदाहरणे आहेत....ते पार करीत करीत भावमालेचा कारवां पुढे जातोय आपण सर्व मित्र सोबत आहात....शेकडो नव्या पुस्तकांची ओळख भावमालेने करून दिलीय हेही नसे थोडके....आजच्या या बदलत्या परिस्थितीत याही पुढे आपण असेच सहकार्य कराल अशी आमचा भावमाला परीवार आपणाकडून अपेक्षा करतेय....करीत राहिल...आपल्या सदिच्छेसाठी मनस्वी आभार....

धन्यवाद !

**प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे**
मुख्यसंपादक
त्रैमासिक भावमाला



# 'पांढर' : उध्दवस्त होत चाललेल्या खेड्यांचे चित्रण


- डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे
शिप्रमं तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य
महाविद्यालय चिखली, जि- बुलढाणा
Mob.No.- 9850314885


**प्रस्तावना:-**

भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर शहरी आणि ग्रामीण भागात झपाट्याने बदल झालेत. त्यामुळे शहरी माणसासोबतच आपसूकच ग्रामीण माणूसही त्या बदलांना सामोरे गेला. शहरांचा प्रभाव शहरालगतच्या ग्रामीण भागावर पडत गेला; पण दुसऱ्या बाजूला महामार्गापासून किंवा वर्दळीपासून दूर असलेल्या आड वाटेवरच्या गावांची अवस्था या आधुनिक काळात दिवसेंदिवस भकास होत गेली. महामार्गावरील खेडी नव्वद पूर्वीच्या काळातच बदलायला लागलेली होती. हळूहळू शहरी सोयीसुविधा या खेड्यांमध्ये पोहोचू लागल्या व त्यातून ही शहराजवळील व महामार्गावरील खेडी शहरी वानाची जाणवू लागली होती. सरकारी कार्यालये, दवाखाने, वाहने, मनोरंजनाची विविध साधने इत्यादींमुळे पारंपरिक खेड्यांपेक्षा ही खेडी आमुलाग्र बदलली. दुसऱ्या बाजूला शहरापासून दूर आडवाटेवरची गावे मात्र या आधुनिक व जागतिकीकरणाच्या काळातही विकासापासून कोसो दूर राहिली. कुठल्याही प्रकारचा आर्थिक विकास या गावांचा झाला नाही. फक्त दळणवळणाची साधने वाढल्यामुळे या गावातील गावकऱ्यांचे शहरात जाणे येणे वाढले. अशी खेडी छोट्या मोठ्या गोष्टींसाठी पूर्णपणे शहरांवर अवलंबून राहू लागली. सततची नैसर्गिक आपत्ती व त्यामुळे निर्माण झालेल्या दुष्काळामुळे आणि त्यातच कुठल्याही सोयी-सुविधा नसल्यामुळे अशी खेडी हळूहळू ओस पडत चालली आहेत. तिथली कृषी व्यवस्था दुष्काळामुळे मोडकळी झाली आहे. मजुरांना बाराही महिने काम मिळत नसल्यामुळे मजुरांचे गावातून शहरांमध्ये स्थलांतर होत आहे, नवीन पिढ्यांना शेती करण्यामध्ये कुठलाही रस राहिलेला नाही. अशा उध्वस्त होऊ पाहणाऱ्या खेड्यांचे भीषण वास्तव रवींद्र शोभणे यांनी 'पांढर' या त्यांच्या २००९ मध्ये प्रकाशित कादंबरी मधून जोरकसपणे मांडले आहे. नागपूरच्या आसपासचा परिसर, नरखेड,वरूड,काटोल तसेच आडवळणाची धुगाव,खेडी,येरला, दिंदरगाव,परसोडी आणि खरसोली ही खेडी तिथल्या मरणप्राय यातनांसह लेखकांनी उभी केली आहे. रवींद्र शोभणे हे आज शिक्षण क्षेत्रात कार्य करीत असले आणि शहरी झालेले



असले तरी त्यांची ग्रामीणत्वाची नाळ तुटलेली नाही. खरसोली हे त्यांचे जन्मगाव.तिथेच प्रारंभीची वीस वर्षे लेखनाचं ग्रामीण संचित त्यांनी गोळा केलं. त्याबद्दल कादंबरीच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, यअनुभवाचं संचित बहाल करणाऱ्या या प्रदेशाला आणि इथल्या माणसांना आपण पुरेशा प्रमाणात न्याय दिलेला नाही,हे असमाधान सातत्याने मनात खूपत होतं.. व्यवसायाच्या निमित्तानं शहरी व मध्यमवर्गीय झालो; पण मनाचा एक कोपरा जगण्याचं सत्व देणाऱ्या या मातीशी घट्टपणे चिटकून होता आणि यातूनच गेली अनेक वर्षे मनात घर करून बसलेलं हे गाव आणि इथली माणसं 'पांढर' च्या निमित्तानं पुन्हा कागदावर जिवंत झालीत.'छ' त्यांनी अनुभवलेला हा परिसर पूर्वीचा असला तरी वर्तमानकालीन बदलांचा शोध घेऊन तिथल्या वर्तमान समस्यांसह त्या परिसराचे वास्तव त्यांनी 'पांढर' मधून साकार केले आहे.

**खेड्यातील उद्वस्त कृषिव्यवस्थेचे चित्रण**

कृषीप्रधान देशात कृषी व्यवस्था टिकणे व तिचा विकास होणे अत्यंत महत्त्वाचे असते. सत्तर टक्के लोकसंख्या ज्या क्षेत्रावर आपली उपजीविका चालवते ते क्षेत्र म्हणजे आपल्या देशातील शेती व्यवसाय होय. जागतिकीकरणामुळे कृषी विकास होऊन चांगले दिवस बघायला मिळतील ही अपेक्षा फोल ठरली. उलट नवनव्या अस्मानी आणि सुलतानी आघातांमुळे कृषी व्यवसायाला भीषण अवकाळा प्राप्त झाली. कादंबरीमध्ये लेखकांनी जी वर्तमान पिढी दाखविली आहे ती शेतीला माय समजणारी शेवटची पिढी होय. आजवर या पिढीने हलाखीच्या परिस्थितीतही जगून कृषी व्यवस्था कशीबशी टिकवून ठेवली. मात्र नव्वदोत्तर काळात जन्माला आलेली पिढी भावनिक दृष्ट्या शेतीपासून पूर्णतः तुटलेली दिसते. त्याला कारण म्हणजे कृषीवलांच्या वाट्याला आलेले दारिद्री नारायणाचे दिवस हेच आहे.

'पांढर' या कादंबरीत दुष्काळाने होरपळून निघालेल्या आडमार्गावरील खरसोली हे गाव व आजूबाजूच्या परिसरातील अर्धपोटी भुकेकंगालांचे भयावह वास्तव अधोरेखित झाले आहे. अलीकडील काळात दर दोन-चार वर्षांनी येणाऱ्या अस्मानी संकटांमुळे दुष्काळी वर्ष कृषीवलांच्या वाट्याला येते.शासन स्तरावरून पाहिजे तशा उपाययोजना व मदत भ्रष्ट यंत्रणेमुळे त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे शेतकरी मोठा किंवा लहान असला तरी त्यांच्या जीवनात प्रचंड अस्थैर्य निर्माण होते.गावचे आधारस्तंभ व साठ एकराचे मालक असलेले साहेबराव पाटील सारख्या परंदाज माणसाला या दुष्काळी परिस्थितीत रस्त्यावर यायची वेळ येते. खरसोली आणि परिसरामध्ये दुष्काळामुळे पाण्याची टंचाई निर्माण होते. त्यामुळे साहेबराव पाटील वाडी नावाचे शेत सावकाराकडे दोन लाख रुपयांमध्ये गहाण ठेवून शेतात ट्यूबवेल खोदतात. परंतु ट्यूबवेलला पाणी न लागल्यामुळे त्यांची संत्र्याची बाग




Scanned with CamSca

सुकायला लागते. दुसऱ्या कामठा नावाच्या शेतातील विहिरीचे पाणी संत्र्याला न देता ते गावकऱ्यांना पिण्यासाठी उपलब्ध करून देतात. संत्र्यांच्या दोन्ही बागा त्यांच्यासमोर वाळून खाक होतात. त्यामुळे त्यांना निद्रानाशाचा त्रास सुरू होतो. त्यातच सावकाराच्या तगाद्यामुळे घरातील इज्जत समजल्या जाणारे दाग-दागिने मोडून शेत सोडवल्या जाते. त्याचे त्यांना अतिव दुःख होते. या तान तणावामुळे त्यांना हृदयविकाराचा झटका येतो आणि त्यातच त्यांचा मृत्यू होतो. म्हणून त्यांची आत्महत्या जरी नसली तरी ते उद्‌ध्वस्त होत चाललेल्या कृषी व्यवस्थेचे बळी ठरतात. साहेबरावांसारख्या मोठ्या कास्तकाराची अशी शोकांतिका झालेली असतांना अल्पभूधारकांची काय स्थिती असेल याची आपण कल्पना करू शकतो. नागोराव कडू, वासुदेव काळे, पंढरी आगे सारखे अल्पभूधारक अत्यंत हतबल झालेत. सावकाराकडून उचललेल्या कर्जाचे वर्षभरात होणारे तिप्पट व्याज ते फेडू शकत नाहीत त्यामुळे देविदास सावकार त्यांच्या जमिनी हडप करतो. त्यातून काही अल्पभूधारकांच्या आत्महत्या होतात. वडिलांना असलेली मुलीच्या लग्नाची चिंता दूर करण्यासाठी दिपाली सारखी संवेदनशील मुलगी आत्महत्या करते. कादंबरी मध्ये विदर्भातील वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या शेतकरी आत्महत्यांच्या वर्तमानपत्रातील बातम्यांचे संदर्भही येतात. त्यामुळे कादंबरीतून खेड्यातील उद्‌ध्वस्त होत चाललेल्या कृषिव्यवस्थेची भीषणता प्रकर्षाने समोर येते.

कृषिअर्थव्यवस्थेच्या अशा अवनतीस केवळ नैसर्गिक संकटे कारणीभूत नसून जागतिकीकरण स्वीकारल्यापासून निर्माण झालेली परिस्थिती सुद्धा तेवढीच कारणीभूत आहे. या परिस्थितीबद्दल डॉ.किशोर सानप म्हणतात, 'एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच ग्लोबलायझेशनच्या प्रगतीचा मुखवटा बेसूर असल्याची जाणीव सर्वप्रथम कृषी व्यवस्थेला झाली.पर्यायाने ग्लोबलायझेशननं नैसर्गिक जीवनाचा विनाश करून कृषी अर्थव्यवस्थेच्या आर्थिक नाड्यांमधलं रक्तच शोषून घेतलं.त्यामुळे कृषीवलांचच जीवन उजाड झालं असं नाही तर भुईचही सृजनशीलत्व नष्ट होऊ लागलं.' ऑ याचा अर्थ जागतिकीकरणाच्या स्वीकारानंतर कृषी व्यवस्थित च्या ऱ्हासाला खूप वेग आला. 'पांढर' कादंबरी मध्ये ग्रामीण भागाची जी विदारक परिस्थिती दिसते तशी स्थिती ग्रामीण भागामध्ये सर्वत्र दिसू लागली. म्हणायला विकासाच्या दिशेने वाटचाल दिसून येते मात्र शेतकरी आणि ग्रामीण यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केल्यास सर्वच कर्जबाजारी झाल्याचे दिसून येते. सोबतच पाण्याचे निर्माण झालेले दुर्भिक्ष्य-पाणी नाही म्हणून शेती नाही, शेतीमध्ये पीक नाही म्हणून पैसा नाही, त्यामुळे शेतीवर जगणारी माणसं आणि जनावरं यांना अन्न पाणी नाही. अशी भीषणता आणि भयानकता सर्वत्र वाढत असलेली दिसते. या परिस्थितीचे सशक्तपणे चित्रण या अगोदरही लेखकांनी केले आहे मात्र 'पांढर' कादंबरीतून रवींद्र शोभणे यांनी ते अधिक



वास्तव आणि विस्तृतपणे मांडले आहे. रवींद्र शोभणे कादंबरीत लिहितात, 'चार जीवांच्या कष्टातून जेमतेम दोन ते तीन जीवांच्या पोटापुरतंच शेतातून पिकत असेल तर किती काळ असा आतबट्ट्याचा व्यवहार करायचा? शेती ही शेतकऱ्यांची दुसरी माय आहे; पण ही दुसरी मायंच जर आपल्या लेकरांचं रक्त असं शोषून घ्यायला निघाली असेल तर त्या माय विषयी उमाळा तरी किती आणून आणायचा? ती दुसरी माय आता माय राहिली नव्हती, तर तिच्या मायेत पुतना मावशीचं विष भिनलं होतं. शेतकऱ्यांचे,कष्टकऱ्यांचे जीव घेणारं. हा अनुभव या पट्ट्यातले सगळेच शेतकरी घेत होते.क

दुष्काळ हे 'पांढर' चे जसे महत्वाचे सूत्र आहे तसेच स्थलांतर हे एक दुसरे महत्त्वाचे सूत्र म्हणावे लागेल. खरसोली गावामध्ये दुष्काळामुळे जेव्हा सर्वसामान्य मजूरवर्गीयांना जगणे मुश्कील होते. तेव्हा वीतभर पोटासाठी दुःखी मनाने त्यांना गाव सोडावे लागते.काहींनी जंगलातल्या मोळ्या नरखेड या गावांमध्ये विकून तर काहींनी फडे विकून संघर्ष करण्याचा प्रयत्न केला; परंतु पुढे तेही शक्य झाले नाही. अशा बिकट परिस्थितीमुळे गावातून सर्वप्रथम स्थलांतर जर कोणी केले असेल तर ते अनुसया मांगीनने. ती नागपूरला जाऊन कुंभार टोली झोपडपट्टीत मोठ्या बहिणीच्या आश्रयाने राहू लागली. त्यानंतर मांगपु-यातील जवळपास सर्वांनीच वरुड येथे कामधंद्याच्या निमित्ताने आसरा घेतला. म्हातारे-कोतारे तसेच घरी ठेवून तरणे- ताठे फक्त कामधंद्यासाठी बाहेर पडले. पुढे महारपुरा सुद्धा त्याच वाटेने काटोलला गेला. नागपूर, पुणे येथे नोकरीला असलेल्या एखाद दुस-या मुलांनी आपल्या घरातील आई वडिलांना शहरात घेऊन गेले. त्यामुळे एका हसत्या- नांदत्या गावाचे एका उद्‌ध्वस्त गावात रुपांतर झाले. महामार्गापासून दूर असलेल्या गावांचे हे आजचे समकालीन वास्तव आहे. विकासापासून कोसो दूर असलेली अशी अनेक गावे या एकविसाव्या शतकात उध्वस्त होऊ पाहत आहेत. खरसोली गावात फक्त म्हातारी माणसे तेवढी शिल्लक राहिली होती. मुकुंदा कांबळे हा म्हातारा मृत झाल्यानंतर कुत्रे त्याचे लचके तोडतात. मानवतेला कलंक ठरणाऱ्या या घटना बघून दीपक धारे म्हणतात, यया स्थलांतराला भविष्य नाही, भूतकाळ नाही आहे तो फक्त पोट जाळणारा वर्तमानकाळ. फी आर्थिक परिस्थितीमुळे जगणे मुश्किल झाल्यानंतर केवळ पोटासाठी हे स्थलांतर झाले.

या एकविसाव्या शतकामध्ये ग्रामीण भागाला उद्‌ध्वस्त करू पाहणाऱ्या अनेक प्रश्नांची चर्चा 'पांढर' कादंबरीमध्ये आलेली आहे. नव्या पिढीची शेतीशी भावनिक गुंतवणूक नसल्यामुळे त्यांचे व्यवहाराच्या पातळीवरचे शेती बद्दलचे विचार साहेबराव पाटलांचा मुलगा अनंताच्या रूपाने कादंबरीतून साकारले आहेत. शेतीत पैसा गुंतवणे म्हणजे अनंताला डेड इन्व्हेस्टमेंट वाटते. शेतीमधून फारसे काही आर्थिक उत्पन्न नसल्यामुळे



येणारी नवी पिढी शेतीपासून दुरावत चालली आहे असे लेखकाला वाटते. शेतीसाठी लागणारे बी-बियाणे, औषधे यांचे दर प्रचंड वाढल्यामुळे शेती करणे परवडत नाही. कादंबरीतील मोठे कास्तकार साहेबराव हे वासुदेव काळे या अल्पभूधारकाला कापूस पेरणी बद्दल एक सल्ला देतात, 'पांढरं सोनं पिकवणं म्हणजे आपल्या बायकोचं कपाळ पांढरं करणं' कारण काय तर शेतकऱ्याचा कापूस जेव्हा विक्रीस बाजारात जातो तेव्हा कापसाचे दर व्यापारी पाडतात. त्यामुळे कापूस विकून लागवड खर्च सुद्धा निघू शकत नाही. यासोबतच संत्रा मार्केट मधील प्रश्न, शेतकरी संघटनेची शेतमालाच्या दराबद्दलची आंदोलने, भारनियमनाचा प्रश्न इत्यादी प्रश्नांची चर्चा कादंबरीमध्ये होत राहते. अलीकडील काळातील शेतीसाठी अत्यंत अन्यायकारक ठरलेला भारनियमनाचा प्रश्न कादंबरीतून सविस्तर आलेला आहे. प्रचंड लोकसंख्या असलेल्या कृषी प्रधान देशात कृषी क्षेत्राला सर्वात शेवटी वीज पुरवठा केला जातो. शेतीसाठी वीज पुरवठा हा रात्रीच्या वेळेस होतो. दिवसभर शेतीत कष्ट उपसून रात्री मोटार पंप चालविणे म्हणजे शेतकऱ्यांसाठी मरणप्राय यातना देणारा विषय. खरसोली मध्ये सध्या तर पाणीच नसल्यामुळे पाणी देण्याचा प्रश्नच येत नाही. मात्र तरीही ही काशिनाथ इंगोले या अल्पभूधारक शेतकऱ्याला वीज कंपनी २७५०० रुपयाचे वीज बिल पाठवते. ग्रामीण भागातील भारनियमनामुळे धुप्पअंधारामुळे गावच्या-गावे रात्री चिडीचिप होऊन त्यांना मसनघाटाची अवकळा प्राप्त होते. राजकीय मंडळी सुद्धा कायद्याचे राजकारण करताना दिसून येते. शासकीय मदत दहा हजार रुपये मात्र ती देत असताना फोटोसेशन,प्रसिद्धी यालाच जास्त महत्त्व दिले जाते.

**निष्कर्ष:-**

पांढर या कादंबरीतून समकाळातील उध्वस्त होत चाललेल्या कृषिव्यवस्थेचे पर्यायाने खेड्यांचे वास्तव रूप प्रकट झाले आहे. महामार्गापासून कोसो दूर असलेल्या खेड्याचे वास्तव ही कादंबरी प्रकट करते. एकविसाव्या शतकातील पहिल्या दशकात वैदर्भीय शेतकऱ्यांनी त्यांच्या समोरील न संपणाऱ्या समस्यांना कंटाळून नाईलाज म्हणून, नाउमेद होऊन आत्मनाशाचा मार्ग पत्करला व अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्याला कारण म्हणजे आतबट्ट्याच्या शेतीमुळे शेतकऱ्यांची बिघडलेली आर्थिक स्थिती होय. त्यातच ग्रामीण भागाकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, नैसर्गिक आपत्ती त्यामुळे ग्रामीण भागामधून शहरांमध्ये स्थलांतर होऊन गावे उद्‌ध्वस्त व्हायला लागली. अशाच दुष्काळाने होरपळणाऱ्या, तहानेने व्याकुळ झालेल्या, आर्थिकदृष्ट्या विपन्नावस्थेत गेलेल्या उद्‌ध्वस्त खरसोली गावातील भुके-कंगालांचे भयावह वास्तव 'पांढर' मधून अधोरेखित झाले आहे.



**संदर्भ:-**


१) शोभणे रवींद्र, 'पांढर' मॅजेस्टिक प्रकाशन,पहिली आवृत्ती २००९, सभोवतालविषयी, पृष्ठ क्रमांक १०

२) सानप किशोर,

३) शोभणे रवींद्र, 'पांढर' मॅजेस्टिक प्रकाशन, पहिली आवृत्ती २००९, पृष्ठ क्रमांक २७७

४) धारे दीपक, यपांढर : रवींद्र शोभणे, ललित, जुलै २०१०, कृष्ण क्रमांक ३७


•••

## अतिक्रमण

अत्र, तत्र, सर्वत्र
दृष्टीस पडते अतिक्रमण

गरजेपोटी की त्याशिवाय
असो दिशा कोणती, तिकडे मार्गक्रमण ।।१।।

अशी दृष्ये आता,नाही नवी
सगळीकडे पहायला मिळतात

सरकारी, निमसरकारी
कुठे तर खाजगी जागाही गिळतात ।।२।।

गावगल्ली ते नवी दिल्ली
सुटतांना दिसते का खाते 'फॉरेस्ट' ?

अतिक्रमण एक सोयीचा उद्योग
म्हणून अनेकांचा त्यास 'इंटरेस्ट' ।।३।।

येथे अतिक्रमण करू नये
उभा तेवढा फलक

तो ही बिच्चारा वेढलेला
पाहिल्यास दिसेल झलक ।।४।।

एक बसवतो बस्तान, मग दुसरा, तिसरा
क्रमशः साखळी घट्ट

मालकी कुणाची
अन् कोण धरतो हट्ट ।।५।।

येते सरकारी मोहीम, कुणाचे जैसे थे
काहींचे हटते

असे नको व्हायला
कुठे मनाला पटते ? ।।६।।

उड्डाणपुल, रेल्वे स्टेशन, धर्मस्थळे, वृद्धाश्रम
वंचित शोधती कुठे कुठे सहारा

पुढाऱ्यांच्या महासत्तेच्या बाता, दुसरीकडे गरजू
त्यांना हवाय, हक्काचा निवारा ।।७।।

- कवि गजानन एम. घुबडे
मु.पो. कोंडोली, ता. मानोरा, जि. वाशिम
मो. ७८७५७९८७४८



Scanned with CamSca